# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 01 August 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – ०१ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०

****

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कोल्हापूरचा नेमबाज स्वप्निल कुसाळेची कांस्यपदकाला गवसणी
- अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गात राज्यांना उपप्रवर्ग पाडता येणार-सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा
- मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना म्हणजे नारीशक्तीचा सन्मान-डॉ. नीलम गोऱ्हे यांचं प्रतिपादन

आणि

- लोकमान्य टिळक तसंच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना सर्वत्र अभिवादन

****

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कोल्हापूरच्या स्वप्निल कुसाळेने पुरुषांच्या ५० मीटर एअर रायफल थ्री पोझिशन प्रकारात कांस्यपदकाला गवसणी घातली. या ऑलिम्पिक स्पर्धेतलं भारताचं हे तिसरं पदक ठरलं आहे. स्वप्नीलने ४५१ पूर्णांक ४ दशांश गुण घेऊन तिसरं स्थान मिळवत कांस्यपदक पटकावलं. कोल्हापूर जिल्ह्याच्या राधानगरी तालुक्यातला रहिवासी असलेला स्वप्नील, सध्या रेल्वेमध्ये तिकीट तपासनीस म्हणून नोकरी करतो, नेमबाजी स्पर्धेसाठी त्याने प्रथम पुण्यात बालेवाडी क्रीडा संकुलात आणि ऑलिम्पिक पात्रता गाठल्यानंतर दिल्ली इथं सराव केला.

स्वप्नीलच्या या यशाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. स्वप्नील कुसाळे महाराष्ट्राचा अभिमान आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याचा गौरव केला आहे. कुस्तीमध्ये भारतासाठी वैयक्तिक पहिलं पदक

पटकावणाऱ्या खाशाबा जाधव यांच्या नंतर तब्बल ७२ वर्षांनी स्वप्नीलने ही कामगिरी केली, असा गौरवपूर्ण उल्लेख शिंदे यांनी केला. त्यांनी स्वप्नीलच्या कुटुंबियांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून त्यांचं अभिनंदन केलं.
उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही स्वप्निलचं अभिनंदन करतांना कोल्हापूरच्या मातीतल्या या सुपुत्राने महाराष्ट्राचा गौरव वाढवत, क्रीडाक्षेत्राला नवं चैतन्य, नवीन ऊर्जा दिली, अशी भावना व्यक्त केली, तर स्वप्नीलच्या अभेद्य यशाला सलाम, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या सामाजिक संपर्क माध्यमावरच्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनीही स्वप्निल कुसाळेचं या यशाबद्दल अभिनंदन केलं आहे.

****

अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गात राज्य सरकारांना उपप्रवर्ग पाडता येऊ शकतील, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. न्यायालयाच्या सात सदस्यीय घटनापीठानं २००४ साली ईव्ही चिनैया प्रकरणात पाच न्यायाधीशांच्या पीठानं दिलेला निर्णय रद्दबातल ठरवत, आज हा निर्णय दिला. अनुसूचित जाती आणि जमातींमधेही आर्थिक आणि सामाजिक स्तरांमधे प्रचंड विविधता असून त्यामुळे सर्व प्रकारच्या मागास वर्गांना एकाच गटात आरक्षण देणं योग्य नाही असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी या निकालात म्हटलं आहे. त्याचं प्रमाण ठरवण्याचा अधिकार राज्यसरकारांना असून शिक्षण आणि नोकरीत अशा प्रकारचं आरक्षण राज्यसरकारांना देता येईल, असं न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.

****

देशात झालेल्या रेल्वे अपघातांच्या घटनांबद्दल आत्मपरीक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. ते आज लोकसभेत रेल्वे मंत्रालयाच्या अनुदानाच्या मागण्यांवर झालेल्या चर्चेला उत्तर देत होते. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात दरवर्षी १७१ रेल्वे अपघात होत असत, हे प्रमाण ६८ पर्यंत कमी झाल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं. २०२२-२३ या आर्थिक वर्षात रेल्वेच्या सुरक्षेसाठी ८७ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आला, हा खर्च मागच्या वर्षी ९७ हजार कोटींपर्यंत गेला. यंदाच्या अर्थसंकल्पात सुरक्षेवरच्या खर्चासाठी एक लाख आठ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद करण्यात आल्याची माहिती वैष्णव यांनी दिली.

****

रस्ते अपघातातल्या जखमींवर प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत असणाऱ्या रुग्णालयात विनाखर्च उपचार उपलब्ध करून देण्यात येत आहेत, रस्ते आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती दिली. ही योजना सध्या चंदीगड आणि आसाम मधे प्रायोगिक तत्वावर सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

पंजाब आणि महाराष्ट्र कोऑपरेटीव बँकेतील खातेदारांना लवकरात लवकर दिलासा मिळावा यासाठी शिवसेना खासदार रविंद्र वायकर यांनी आज केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीताराम यांची दिल्लीत भेट घेतली. या बँकेतील आर्थिक घोटाळा उघडकीस आल्यानंतर रिझर्व बँकेने आर्थिक निर्बंध घातले होते, यामुळे या बँकेतील खातेदार, सहकारी पतसंस्था आणि सोसायट्या, नागरी सहकारी बँका यांना स्वतःचाच पैसा बँकेतून काढताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याकडे वायकर यांनी लक्ष वेधलं. या प्रकरणी लक्ष घालण्याचं आश्वासन सीतारामन यांनी दिल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

मुंबई-नाशिक महामार्गावरील खड्ड्यांमुळे उद्भवत असलेली वाहतूक कोंडी टाळण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना राबवण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. यासंदर्भात मंत्रालयात आज झालेल्या बैठकीत ते बोलत होते. येत्या १० दिवसांत या महामार्गावरील वाहतूक सुरळित न झाल्यास संबंधितांच्या निलंबनाच्या कारवाईचा इशाराही पवार यांनी दिला आहे.

****

मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण ही योजना म्हणजे नारीशक्तीचा सन्मान असल्याचं, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण सन्मान यात्रेत त्या आज बोलत होत्या. या योजनेअंतर्गत रक्षाबंधनापर्यंत पात्र लाभार्थी लाडक्या बहिणींच्या खात्यात मुख्यमंत्री भावाकडून रक्कम जमा होईल, असं त्यांनी सांगितलं. पैठण तालुक्यात महिला अस्मिता भवन उभारण्याचं नियोजन करावं, या भवनात महिलांसाठी क्रीडा, मनोरंजन, वाचनालय आणि बचत गट बैठका यासाठी सुविधा निर्माण करण्याचा मानस गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

****

दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या प्रचारासाठी शिवसेनेकडून राज्यभरात महिला मेळाव्यांचं आयोजन करण्यात येणार आहे. शिवसेना सचिव आणि प्रवक्त्या मनीषा कायंदे यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सध्या या योजनेतून दररोज लाखो अर्ज सादर केले जात आहेत. जास्तीत जास्त महिलांनी याचा लाभ घ्यावा, यासाठी सन्मान यात्रेतील मेळाव्यांतून या योजनेची माहिती दिली जाणार असल्याचं कायंदे यांनी सांगितलं.

****

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना 'भारतरत्न' पुरस्कार देण्यात यावा यासाठी आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहांशी चर्चा करणार, असं आश्वासन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिलं आहे. आज पुणे इथं अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मातंग समाज समन्वय समितीतर्फे घेतलेल्या अभिवादन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी आठवले यांच्या हस्ते पहिला 'स्वर्गीय हनुमंतराव साठे सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार' बाळासाहेब जानराव यांना प्रदान करण्यात आला.

थोर स्वातंत्र्यसेनानी, लेखक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या शतकोत्तर चौथ्या पुण्यतिथी निमित्त आणि मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक अण्णा भाऊ साठे यांच्या शतकोत्तर चौथ्या जयंतीनिमित्त आज त्यांना सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज राजभवनात लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

छत्रपती संभाजीनगर इथं महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी अण्णा भाऊच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केलं. शहरातील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास आज सकाळपासून सामाजिक, शैक्षणिक संघटनेच्या वतीने पृष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येत आहे. अण्णाभाऊंच्या कार्याची महती विशद करणाऱ्या गीतांचं सादरीकरण स्थानिक कलामंचावरून करण्यात आलं.

नांदेड इथं माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण, माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीला अभिवादन केलं. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, शहरात जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

बीड इथं अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची हत्तीवरून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी निघालेल्या दिंडीमध्ये मोठ्या संख्येने आबालवृद्ध सहभागी झाले होते. अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार द्यावा, अशी मागणी त्यांच्या अनुयायांनी केली. शहरातील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याजवळ या मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. आमदार संदीप क्षीरसागर, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते

****

पंढरपूरहून शेगावकडे परतीच्या प्रवासावर निघालेल्या गजानन महाराजांच्या पालखीचं आज जालना इथं महापालिका आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर यांनी स्वागत केलं. यावेळी उपायुक्त नंदा गायकवाड यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते

****

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथल्या आंतरभारती वतीने दिला जाणारा स्नेहसंवर्धन पुरस्कार २०२४ केरळच्या कन्या सिंधू किणिकर–नवगिरे यांना दिला जाणार आहे. येत्या १५ ऑगस्ट रोजी या पुरस्काराचं वितरण होणार आहे. परंपरेनुसार गतवर्षीचे पुरस्कार प्राप्त नरपती कुंजेडा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाईल. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आंतरभारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष अमर हबीब आणि आंतरभारती लातूरचे अध्यक्ष डॉ. बी. आर. पाटील हे उपस्थित राहणार आहेत. अन्य राज्यातून येऊन अंबाजोगाईत स्थायिक झालेल्या आणि अंबाजोगाईच्या गौरवात भर घालणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दिला जातो.

****

छत्रपती संभाजीनगरच्या सातारा देवळाई परिसरात निर्माण केलेल्या संकल्प वनराईला जगातील पातळीवरील इन्व्हायरोकेअर ग्रीन अवार्ड २०२४ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.